## दृष्टिक्षेप

### यामाहाच्या विक्रीत २३ टक्के वाढ

**पुणे |** इंडिया यामाहा मोटर्सने विक्रीतील वृद्धीचा ट्रेंड जपत २३ टक्क्यांची वाढ गाठली आहे. देशांतर्गत बाजारपेठेत २०१२ च्या पहिल्या चरणात २७ हजार ५० युनिट्सची विक्री झाली असून, निर्यातीचे चित्र १३ हजार ३८४ एवढे आहे. त्यामुळे फेब्रुवारीअखेरची युनिटविक्री ४० हजार ६५५ एवढी असल्याचे कंपनीतर्फे सांगण्यात आले आहे.

### सेन्सेक्स : प्रमुख कंपन्यांचे भाव

| कंपनी | भाव (रु.) | वाढ/घट |
|---|---|---|
| बजाज ऑटो | १७११.२५ | ↑ ०.५७% |
| भारती एअरटेल | ३३५.०५ | ↓ ३.६६% |
| भेल | २७६.०० | ↓ ३.२३% |
| सिप्ला | ३०६.२५ | ↓ २.११% |
| डीएलएफ | १९७.४५ | ↑ २.७३% |
| एचडीएफसी | ६५१.४० | ↓ ०.६७% |
| एचडीएफसी बँक | ५०७.६० | ↓ ०.७२% |
| हीरो मोटोकॉर्प | १८६७.१० | ↓ १.०७% |
| हिंदाल्को | १३१.८५ | ↓ ५.७५% |
| हिंदुस्तान युनिलिव्हर | ३८०.८५ | ↓ ०.१८% |
| आयसीआयसीआय बँक | ८५३.२० | ↓ १.१८% |
| आयटीसी लि. | २१०.०० | ↑ १.४५% |
| इन्फोसिस | २८४९.०५ | ↑ १.४१% |
| जयप्रकाश असो. | ६९.६० | ↓ १.०७% |
| जिंदाल स्टील | ५४५.९५ | ↓ ३.७६% |
| एल.अँड टी. | १२३६.०५ | ↓ २.४४% |
| महिंद्रा अँड महिंद्रा | ६८०.४५ | ↑ ०.६४% |
| मारुती सुझुकी | १३२८.८० | ↓ १.०१% |
| एनटीपीसी | १७४.३५ | ↓ ०.११% |
| ओएनजीसी | २८१.६० | ↓ ०.६२% |
| रिलायन्स इंड. | ७७६.५० | ↓ २.६८% |
| रिलायन्स इन्फ्रा. | ६१८.५५ | ↓ ५.७३% |
| रिलायन्स कम्यु. | ९१.६० | ↓ .७३% |
| एसबीआय | २१५१.०० | ↓ १.०६% |
| स्टर्लाइट | ११३.८५ | ↓ ५.४४% |
| टाटा कन्सल्टन्सी | १२०१.६० | ↓ ०.६२% |
| टाटा मोटर्स | २६६.०० | ↓ २.७२% |
| टाटा पॉवर | १०८.६० | ↓ ४.११% |
| टाटा स्टील | ४२६.२० | ↓ ५.४०% |
| विप्रो लि. | ४३०.८० | ↑ ०.०५% |

### मार्केट इंडेक्स

| | | |
|---|---|---|
| सेन्सेक्स | १७१७३.२९ | ↓ |
| मागील १७३६२.८७ | तफावत - १८९.५८ | |
| निफ्टी | ५२२२.४० | ↓ |
| मागील ५२८०.३५ | तफावत - ५९.४० | |
| सोने | २८३५०.०० | ↓ |
| मागील २८५००.०० | तफावत + १५०.०० | |
| चांदी | ५७०००.०० | ↓ |
| मागील ५८०००.०० | तफावत १००० | |
| डॉलर | ५०.३६ | ↑ |
| मागील ४९.८४ | रुपया कमजोर | |

(सोने-चांदीचे भाव रात्रीचे आहेत. त्यात बदल शक्य आहे.)

### औरंगाबाद : ठोक बाजारभाव

| | | | |
|---|---|---|---|
| हिरवी मिरची | २५०० | कोथिंबीर (प्रतिशेकडा) | ३०० |
| कांदे | २५० | दूधी भोपळा | ६५० |
| फुलकोबी | ११०० | सिमला मिरची | २००० |
| टोमॅटो | ७५० | कारले | १२५० |
| वांगे | १५०० | मोसंबी | १४५० |
| शेवगा | ३००० | अंजीर | २३५० |
| गाजर | १३०० | चिकु | १००० |
| अद्रक | ८५० | कैरी | ३००० |
| काकडी | १२५० | टरबुज | १९०० |
| भेंडी | २१०० | खरबुज | १९०० |
| पत्ता कोबी | ७०० | हरियल बुट | १३५ |
| लिंबू | ३५०० | वालशेंगा | ६०० |
| दोडका | १७५० | मका | ७०० |
| मेथी (प्रतिशेकडा) | ३५० | द्राक्षे | २७०० |
| पालक (प्रतिशेकडा) | २५० | वाटाणा | १७०० |

### औरंगाबाद : धान्य बाजारभाव

| | | | |
|---|---|---|---|
| गहू | १३०० | ज्वारी शाळू | २४५० |
| बाजरी | ११५० | हरभरा काबली | ६००० |
| मका | १११५ | चिंच | २८०० |
| तूर | ३४७५ | | |

# स्त्रीशक्तीच्या जागराने उजळते आहे भारतीय कॉर्पोरेट जगत



चंदा कोचर

वृत्तसंस्था | नवी दिल्ली

भारतीय उद्योगजगतात स्त्रीशक्तीचा दबदबा सातत्याने वाढतो आहे. भारतीय कंपन्यांतील महिला संचालकांच्या आकडेवारीवर सहज नजर टाकली असता हे लक्षात येते. ही संख्या आता ६.६९ टक्क्यांवर पोहोचली आहे. गेल्या वर्षी महिला संचालकांचे प्रमाण होते, ५.२६ टक्के ! महिला संचालकांच्या संख्येच्या बाबतीत भारताने जपान आणि इटलीसारख्या विकसित देशांनाही मागे टाकले आहे. जगाचा विचार केला असता महिला संचालकांच्या बाबतीत भारताचा क्रमांक ३० आहे.

मायहायरिंग डॉटकॉम यांच्या वतीने करण्यात आलेल्या सर्वेक्षणानुसार भारतीय कंपन्यात महिला कर्मचाऱ्यांची संख्या ३० टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे. देशातील १४०० कंपन्यांचा समावेश या सर्वेक्षणात करण्यात आला. जगाच्या बाबतीत बोलायचे झाले तर सर्वाधिक महिला संचालक नॉर्वेमध्ये आहेत. महिला संचालकांचे प्रमाण नॉर्वेत ३७ टक्क्यांपर्यंत पोहोचले आहे. त्यानंतर क्रमांक लागतो तो स्वीडनचा. स्वीडनमध्ये महिला संचालकांचे प्रमाण आहे २६.३२ टक्के तर तिसऱ्या क्रमांकावरील फिनलँडमध्ये हे प्रमाण आहे २३.५६ टक्के. अमेरिकेतील कंपन्यात संचालकपद भूषविणाऱ्या महिलांची संख्या आहे १६.३४ टक्के तर दक्षिण आफ्रिकेत हीच संख्या आहे १६.१९ टक्के. कॅनडामध्ये हे प्रमाण आहे ११ टक्के, आयर्लंडमध्ये १०.७६ टक्के, स्पेनमध्ये १०.०५ टक्के, न्यूझीलंडमध्ये ९.४३ टक्के आणि स्वित्झर्लंडमध्ये महिला संचालकांचे प्रमाण आहे ८.५६ टक्के. दुसरीकडे जपानमध्ये महिला संचालकांची संख्या आहे फक्त १.२३ टक्के तर इटलीत ४.२३ टक्के ! सौदी अरेबियात ०.२३ टक्के महिला संचालकपदी आहेत. कतारमध्ये हेच प्रमाण ०.६५ टक्के तर संयुक्त अरब अमिरातमध्ये केवळ ०.९९ टक्के.

मायहायरिंग डॉटकॉमचे सीईओ राजेश कुमार यांच्या मते, भारतीय कंपन्यांत महिलांना वरिष्ठ स्तरावरील जबाबदारी देण्यासाठी आणखी ठोस योजनांची गरज आहे. देशातील कंपन्यांत ३० टक्के महिला काम करतात; परंतु त्यापैकी केवळ १५ टक्के महिला वरिष्ठ पदांवर आहेत. मात्र, गतीने विकास असणाऱ्या फॉर्च्यून-५५० गटांतील कंपन्यांत सीनियर एक्झिक्युटिव्ह स्तरावर काम करणाऱ्या महिलांचे प्रमाण आहे २१.१ टक्के.

### उद्योगजगातील मान्यवर महिला

- **चंदा कोचर :** प्रमुख आयसीआयसीआय बँक
- **शिखा शर्मा :** सीईओ, ॲक्सिस बँक
- **मीनू जिंदाल :** जिंदाल शॉ लिमिटेड
- **लीना श्रीवास्तव :** रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर
- **राधा सिंह :** येस बँक
- **रेनू सूद कर्नाड :** एचडीएफसी लिमिटेड
- **विनिता गुप्ता :** लुपिन फार्मा.

### तरीही भारत मागे

जगाच्या तुलनेत महिलांच्या प्रगतीबाबत भारतीय कंपन्या अजून मागे आहेत. आपली धोरणे आणि मानसिकता अजूनही १५ ते २० वर्षे जुनी आहे. आता परिस्थिती वेगाने बदलते आहे. मध्य स्त्रावर काम करणाऱ्या महिलांची संख्या ३० ते ३५ टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे. आगामी काळात पुरुषांच्या बरोबरीने ही संख्या असेल.
**अजय आनंद,** अभिव्यक्ती रिसोर्सेस

**बाजारात घसरण** | काँग्रेसच्या सुमार कामगिरीने गुंतवणूकदारांच्या आशेवर पाणी

# ‘सपा’च्या सायकलमुळे सेन्सेक्सला लागला ब्रेक

मुंबई | प्रतिनिधी

काँग्रेसला चकवा देत उत्तर प्रदेशच्या विधानसभा निवडणुकीत बहुमत मिळवत सत्ता स्थापनेकडे सुसाट वेगाने निघालेल्या समाजवादी पक्षाच्या सायकलने ‘सेन्सेक्स’ला मात्र करकचून ब्रेक लागला. काँग्रेसच्या सुमार कामगिरीने गुंतवणूकदारांच्या साऱ्या आशा धुळीस मिळाल्या अन् आता केंद्रातील सरकारला सुधारणा कार्यक्रम राबवताना अडथळ्यांच्या शर्यतीला तोंड द्यावे लागण्याच्या भीतीतून झालेल्या नफेखोरीमध्ये सेन्सेक्स १९० अंकांनी घसरला.

निवडणूक निकालांच्या पार्श्वभूमीवर मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सकाळी सावध पण १७,३३६.६४ अंकांच्या काहीशा नीचांकी पातळीवर उघडला. दिवसभर १७,६११.९६ आणि १७,१२८.२८ अंकांच्या पातळीत झुलल्यानंतर सेन्सेक्स दिवसअखेर १९० अंकांनी घसरून १७,१७३.२९ अंकांच्या पातळीवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजारातील निफ्टीचा निर्देशांकदेखील ५७.९५ अंकांनी घसरून ५२२२.४० अंकांच्या पातळीवर बंद झाला. उत्तर प्रदेशमधील विधानसभा निवडणुकीमध्ये काँग्रेस पिछाडीवर पडल्याने कदाचित यापुढे सुधारणा कार्यक्रम राबवताना केंद्रातील सरकारला विरोधी पक्षांकडून अडचणींचा सामना करावा लागण्याची भीती बाजाराला वाटत असल्याचे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले. उत्तर प्रदेशात काँग्रेसला विजय मिळाला असता तर केंद्र सरकारला आपला सुधारणा कार्यक्रम राबवणे आणखी सुलभ ठरले असते. त्यामुळे बाजाराचे लक्ष काँग्रेसच्या विजयाकडे होते, असे मत बोनान्झा पोर्टफोलिओच्या वरिष्ठ विश्लेषक शानू गोयल यांनी व्यक्त केले. निवडणुकींचे निकाल मुलायम सिंह यांच्या समाजवादी पक्षाच्या पारड्यात पडू लागल्यानंतर बाजाराचा नूर पालटला. बहुमत मिळाल्याने समाजवादी पक्ष काँग्रेसच्या मदतीशिवाय सरकार स्थापनेचा दावा करू शकणार आहे. बाजाराला हे रुचले नाही आणि तुफान विक्रीचा मारा सुरू झाला. या विक्रीच्या माऱ्यात बँका, तेल आणि वायू, भांडवली वस्तू, ऊर्जा आणि धातू समभागांना मोठा फटका बसला.

वृद्धीच्या चिंतेने युरोप शेअर बाजार दुपारनंतर घसरला. ब्रिटन, फ्रान्स, जर्मनी शेअर बाजार गडगडले. चीनचा आर्थिक विकासदर गेल्या आठवर्षांत पहिल्यांदाच घसरल्याने चीन शेअर बाजारही सोमवारी घसरला होता. आशियाई शेअर बाजारातही घसरणीचा सूर होता. हाँगकाँग, चीन, जपान, सिंगापूर, दक्षिण कोरिया आणि तैवान शेअर बाजार घसरले. या सगळ्या घडामोडींचाही बाजारावर नकारात्मक परिणाम झाला.



### धातू समभागांना फटका

बाजारात झालेल्या विक्रीच्या माऱ्याचा टाटा स्टील, स्टर्लाईट, जिंदाल स्टील, हिंदाल्को या कंपन्यांना मोठा फटका बसला. परिणामी धातू निर्देशांक ३.८८ अंकांनी गडगडला.

**टॉप लुझर्स :** भारती एअरटेल, भेल, टाटा मोटर्स, एल अँड टी, सिप्ला, आयसीआयसीआय बँक, हिरो मोटोकॉर्प, स्टेट बँक.

**टॉप गेनर्स :** डीएलएफ, आयटीसी, इन्फोसिस, मारुती सुझुकी.

### जीनिव्हा शो...




जीनिव्हा येथे सुरू झालेल्या जीनिव्हा इंटरनॅशनल मोटार शोमध्ये सादर करण्यात आलेली द न्यू किया सीड गाडी. हे प्रदर्शन ८ मार्चपासून लोकांसाठी खुले होणार आहे.

# बँक ग्राहकांना दिलासा

## एसबीआय : मिनिमम बॅलन्सवरील शुल्क माफ

बिझनेस ब्युरो | नवी दिल्ली

सार्वजनिक क्षेत्रातील देशातील सर्वात मोठी बँक स्टेट बँक ऑफ इंडियाने खात्याच्या देखभालीसाठी लागणारे शुल्क कमी केले आहे. खात्यात किमान ठरावीक रक्कम न ठेवणाऱ्या खात्यांवर आतापर्यंत बँक शुल्क आकारायची. ते आता माफ करण्यात आल्याने ग्राहकांना दिलासा मिळाला आहे.

स्टेट बँक ऑफ इंडिया (एसबीआय) खात्यात किमान रक्कम न राखणाऱ्या खातेदारांकडून दर तिमाही १०० ते २२५ रुपये शुल्क म्हणून आकारायची. बँकेने जारी केलेल्या परिपत्रकानुसार बचत खात्यातील मिनिमम बॅलन्सवर खातेदारांना आता कसलेही शुल्क द्यावे लागणार नाही. आतापर्यंत बँक मेट्रो, शहरी तसेच अर्धनागरी भागात किमान रक्कम शिल्लक नसल्यास प्रतितिमाही ५००-१००० रुपये तर ग्रामीण भागात १०० रुपये शुल्क ग्राहकांकडून घ्यायची. ग्राहकांना आता किमान १०० रुपये जमा रकमेवर एसबीआयमध्ये बचत खाते उघडता येणार आहे.

## ओबीसी बँक : एफडीवरील व्याजदरात ३.५ टक्क्यांपर्यंत वाढ

**नवी दिल्ली |** सार्वजनिक क्षेत्रातील सर्वात मोठ्या स्टेट बँक ऑफ इंडियाने आपल्या मुदत ठेवीवरील व्याजदरांत वाढ केल्यानंतर ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्सनेही (ओबीसी) मुदत ठेवीवरील (एफडी) व्याज वाढवले आहे. ओबीसीने १५ लाखांपेक्षा अधिक रकमेच्या एफडीवर ८.५ टक्के व्याज देण्याचा निर्णय घेतला आहे. बँकिंग क्षेत्रात खेळत्या भांडवलाची चणचण भासत आहे. त्यामुळे भांडवल वाढवण्याच्या हेतूने ग्राहकांना आकर्षित करण्यासाठी बँका एफडीवर व्याज दर वाढवून देत आहेत. यामुळे बँकांतील जमा रकमेत वाढ होणार आहे. ओबीसी आतापर्यंत १५ लाखांपेक्षा अधिक रकमेच्या एफडीवर ५ टक्के व्याज देत असे. ओबीसी बँकेने १ मार्चपासून ठराविक मुदत ठेवींवर ३.५ टक्क्यांपर्यंत अधिक व्याज देण्याचे ठरवले आहे. ४६ ते ९० दिवसांच्या एफडीवर ३.२५ टक्के अधिक व्याज मिळणार आहे. त्यामुळे या एफडीवर ग्राहकांना ९ टक्के व्याज मिळणार आहे, तर ९१ ते १७९ दिवसांच्या मुदत ठेवींवरील व्याज ८ वरून ९ टक्के करण्यात आले आहे.

### सन फार्माला पुरस्कार



मुंबई येथे बिझनेस इंडिया पुरस्कार गुजरातचे मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांचा हस्ते स्वीकारताना सन फार्माचे दिलीप संघवी.

## तयार कपडे : निर्यात वाढणार

**मुंबई |** पश्चिम बाजारपेठांमध्ये विशेष करून अमेरिका आणि युरोपमध्ये मंदीचे वारे वाहत असतानाही देशातील तयार कपड्यांची निर्यात चालू आर्थिक वर्षाच्या अखेरपर्यंत १४ टक्क्यांनी वाढून १३ अब्ज डॉलर्सवर जाण्याचा अंदाज ॲपरल एक्स्पोर्ट प्रमोशन कौन्सिलने (एईपीसी) व्यक्त केला आहे. गेल्या आर्थिक वर्षात ही निर्यात ११.४ अब्ज डॉलर झाली होती. युरोप आणि अमेरिकेतल्या बाजारपेठेवरील परावलंबित्व कमी करण्यासाठी निर्यातदारांनी आता जपान, इस्त्रायल, रशिया, दक्षिण आफ्रिका, लॅटिन अमेरिकासारख्या नव्या बाजारपेठांमध्ये प्रवेश करण्यास सुरुवात केली असल्याचे ‘एईपीसी’चे अध्यक्ष ए. सक्थीवेल यांनी सांगितले. देशातील तयार कपड्यांच्या एकूण निर्यातीमध्ये अमेरिका आणि युरोपचा एकत्रित वाटा ६५ टक्के असून यंदाच्या आर्थिक वर्षात एप्रिल ते डिसेंबर या कालावधीत तयार कपड्यांची निर्यात २५ टक्क्यांनी वाढून ती ९.७ अब्ज डॉलरवर गेली. त्या अगोदरच्या वर्षात ती ७.७ अब्ज डॉलर झाली होती.

## मराठवाडा

# मृताच्या कुटुंबीयांना ६५ लाख देण्याचे आदेश

प्रतिनिधी | नांदेड

सन २००९ मध्ये कार अपघातात मृत्युमुखी पडलेले डॉ. सुभाष मरळककर यांच्या कुटुंबीयांना अपघात विम्यापोटी ६५ लाख रुपयांची नुकसान भरपाई द्यावी, असा आदेश अतिरिक्त तदर्थ न्यायाधीश ए. आर. जी. कुरेशी यांनी २९ फेब्रुवारीला दिला. अपघात विम्यापोटी एवढी मोठी रक्कम देण्याचा आदेश देण्याची न्यायालयाच्या इतिहासातील ही पहिलीच घटना आहे.

आधार हॉस्पिटलचे संचालक डॉ. सुभाष दाळपुसे मरळककर (३२) पत्नी व दोन मुलासह महाबळेश्वर येथे सहलीला गेले होते. तेथून परतत असताना ६ जून २००९ रोजी वसमत मार्गावरील मालेगावजवळ त्यांच्या कारला ट्रकने जोरदार धडक दिली. या अपघातात डॉ. सुभाष मरळककर जागीच ठार झाले.

या प्रकरणात अपघात विम्याची रक्कम द्यावी म्हणून त्यांच्या कुटुंबीयांनी न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनी व टाटा एआयजी या कंपनीविरुद्ध खटला दाखल केला. या खटल्यात मरळककर यांच्या वतीने ॲड. मुमताजअली कादरी यांनी बाजू मांडली. न्या. कुरेशी यांनी दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर या खटल्याचा निकाल जाहीर केला. विमा कंपन्यांनी मरळककर कुटुंबीयांना ४९ लाख ११ हजार रुपये, त्यावर ९ टक्के व्याज व खटल्याचा खर्च असे ६५ लाख रुपये द्यावेत, असा आदेश न्यायालयाने दिला. अन्य एका खटल्यात उपकार्यकारी अभियंता गोविंद लोणकर (५५) यांच्या अपघाती मृत्यूप्रकरणीही लोणकर यांच्या कुटुंबीयांनाही विमा कंपन्यांनी १९ लाख रुपये, १२ टक्के व्याज व खटल्याचा खर्च द्यावा, असा आदेश अतिरिक्त सत्र न्यायाधीश के. के. गौर यांनी दिला.

लोणकर यांचा हट्टा पोलिस ठाणे अंतर्गत हिंगोली महामार्गावर २००९ मध्ये कार-बस अपघातात मृत्यू झाला होता.

## लातूरच्या जिल्हा उपनिबंधकांना मारहाण

**लातूर |** जिल्हा उपनिबंधक राजेंद्र खंडाईत यांना शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी मंगळवारी दुपारी मारहाण केल्याने शिवाजीनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उपनिबंधकांचे जिल्हाधिकारी कचेरी परिसरात असलेल्या प्रशासकीय इमारतीत कार्यालय आहे.

खंडाईत कार्यालयात बसले असता शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी म्हणून संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजकुमार सस्तापुरे व रामचंद्र खंडाळे, रूपेश शंके, मोहन गवळी हे चौघे त्यांच्याकडे गेले. त्यांनी शासनाचे परिपत्रक दाखवले. ते बाजार समित्यांनी शेतकऱ्यांना न्याय द्यावा, समित्या न्याय देत नसतील तर उपनिबंधकांनी हस्तक्षेप करावा, अशा आशयाचे होते; पण उपनिबंधकांनी पत्रकानुसार काम बघण्यास कुचराई केली, असा आरोप कार्यकर्त्यांनी केला.

त्यावरून बाचाबाची झाली आणि कार्यकर्त्यांनी मला चापटा मारल्या, असे फिर्यादीत खंडाईत यांनी म्हटले आहे. त्या चौघांनाही अटक करण्यात आली आहे, तर आम्ही शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर उपनिबंधकांकडे गेलो असता त्यांनीच उद्धट भाषा वापरली व शेतकरीविरोधी भूमिका घेतली, असे शेतकरी संघटनेच्या वतीने दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे.

# अफूप्रकरणी दोघांना पोलिस कोठडी

### अफूच्या बोडांची नांदेड मध्ये विक्री





अफू प्रकरणातील आरोपी सतनामसिंग मुक्तारसिंग राजपूत.

प्रतिनिधी | बीड

मोहा (ता. परळी) येथील अफूची बोंडे नांदेडमध्ये विकणारा सतनामसिंग मुक्तारसिंग राजपूत व कार चालक श्रीकृष्ण केकान या दोघांना परळी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी आर. आर. काळे यांनी नऊ मार्चपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

स्थानिक गुन्हे शाखेने नांदेड येथे गुरुद्वारा परिसरात सतनामसिंग मुक्तारसिंग राजपूत (रा. पंजाब) याला अटक केली होती. त्यानंतर त्याला बीड येथे आणण्यात आले. अप्पर पोलिस अधीक्षक श्रीकांत धिवरे, पोलिस निरीक्षक सुदर्शन मुंडे यांनी त्याची कसून चौकशी केली.

कारचालक श्रीकृष्ण केकान हा त्याच्या साथीदार असल्याची माहिती समोर आली. त्यानंतर पोलिसांनी अंबाजोगाई येथे सोमवारी केकान याला अटक केली.

### यापूर्वीही त्या दोघांना पकडले होते

सतनामसिंग राजपूत हा मोहा येथील शेतकऱ्यांकडून बोंडे विकत घेऊन नांदेडला विक्री करायचा. अंबाजोगाई येथील कारचालक श्रीकृष्ण केकान आणि सतनामसिंगची यांची ओळख झाली. सतनामसिंग केकानला जास्तीचे भाडे देऊन परळीतून नांदेडला अफूची बोंडे नेत असे. २०१० मध्ये सिरसाळा पोलिसांनी सतनामसिंगसह श्रीकृष्ण केकान, सुखदेवसिंग ढिल्लो यांना पकडले होते. त्यानंतर त्यांची जामिनावर मुक्तता झाली होती.
**सुदर्शन मुंडे,** पोलिस निरीक्षक, गुन्हे शाखा

# शहिदांच्या स्मृतींना उजाळा देणारी होळी !

**किल्लेधारूरची परंपरा** | धूलिवंदनापासून रंगपंचमीपर्यंत साजरा केला जातो आजही उत्सव, पाच दिवस होळी पेटलेलीच ठेवली जाते

संदिपान तोंडे | किल्लेधारूर

किल्लेधारूर शहरात राजपूत समाजाच्या वतीने अनेक वर्षांपासून साजरी करण्यात येत असलेल्या होळीच्या सणाला वेगळे महत्त्व आहे. हा सण देशासाठी बलिदान देणाऱ्या, त्याग करणाऱ्यांची आठवण म्हणून होळीचे गीत गाऊन त्यांच्या स्मृतींना उजाळा देत साजरा केला जातो. पाच दिवस हा सण साजरा होतो. मराठवाड्यात धारूरच्या होळीचे महत्त्व काही औरच आहे.

किल्लेधारूर शहराला एक ऐतिहासिक परंपरा आहे. ती जोपासण्याचे काम आजही सुरू आहे. या सणासाठी बाहेरगावी गेलेली मंडळी पाच दिवस गावाकडे येतात. होळीच्या दिवशी सायंकाळी विधिवत पूजा करून होळीला अग्नी देण्यात येतो. ती होळी पाच दिवस पेटलेलीच ठेवली जाते. या सणासाठी प्रत्येकाकडे गोड-धोड पदार्थ बनवले जातात. होळीच्या दुसऱ्या दिवसापासून म्हणजे धूलिवंदनापासून रंगपंचमीपर्यंत कटघरपुऱ्यातून हनुमान चौकापर्यंत मुख्य रस्त्याने रोज दुपारी ‘चाचर’ काढण्यात येते.

या चाचरीत रंगांची उधळण केली जाते. राजपूत बांधव ढोलकी, झांज वाद्य वाजवत समाजाची परंपरा सांगणारी गीते गातात. या वेळी दिसेल त्याच्यावर रंगांची उधळण केली जाते. रंग उधळण्याचे काम रोज एका कुटुंबाकडे असते. यामध्ये शुक्ला, हजारी, दिख्खत, तिवारी, दुबे, सदरीवाल यांचा समावेश असतो. रात्रीच्या वेळी चाचर काढून त्यात गीते गायली जातात. मात्र, त्या वेळी रंगाची उधळण केली जात नाही. सामाजिक एकात्मता मजबूत करण्याचे कामही या सणाच्या माध्यमातून केले जाते. दुपारच्या वेळी ठंडाई केली जाते. पाच दिवस ही ठंडाई सुरू असते. दूध व इतर मिश्रणापासून बनविलेल्या ठंडाई पिण्याकडे इतर समाजाच्या मित्रांनाही आमंत्रित केले जाते.



### हल्ला परतवून लावला

इंग्रज राजवटीत या सणाची परंपरा जोपासणे जिकिरीचे काम होते. हा भाग निझाम राजवटीच्या ताब्यात होता. या भागात निझामाच्याच हकसार संघटनेची असलेली दहशत मोडून राजपूत समाजाने होळी पेटवली. त्या वेळी हकसार संघटनेच्या व्यक्तींनी राजपूत समजावर तलवारीने हल्ला चढवला. तोडीस तोड उत्तर देऊन राजपूत समाजाने हल्ला परतवून लावला. यात लक्ष्मणसिंह दिख्खत ऊर्फ पापासिंह यांना प्राणाची आहुती द्यावी लागली. तेव्हापासून तेवढ्याच उत्साहात होळी साजरी करून शहिदांच्या स्मृतीला उजाळा दिला जातो.
**अजयसिंह दिख्खत (ठाकूर),** किल्लेधारूर.

### मोहाप्रकरणी सुनावणी

**उस्मानाबाद |** जिल्हा परिषद गटाची मते पंचायत समितीसाठी आणि पंचायत समितीचे मते जिल्हा परिषद गटासाठी मोजल्याने निर्माण झालेल्या प्रकरणावर जिल्हा न्यायालयात बुधवारी सुनावणी ठेवण्यात आली आहे.

### युवकाचा बुडून मृत्यू

**परभणी |** बुडणाऱ्या व्यक्तीस वाचविण्यासाठी गेलेल्या युवकाचाच बुडून मृत्यू झाल्याची घटना मानवत तालुक्यातील कोल्हा परिसरात घडली. अनिल राठोड (२२) असे मृताचे नाव आहे. राठोड आणि संजय आडे हे शेतात गेले होते. पाणी आणण्यासाठी गेलेल्या संजय पाय घसरून विहिरीत पडले. त्यांना वाचविण्याच्या प्रयत्नात कपारीवर आदळून राठोड यांचा मृत्यू झाला. आडे हा विहिरीतील पाइपला धरून बसल्याने त्याचे प्राण वाचले.